# नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)

सेमिनरी हिल्स, नागपूर-०६

## विनावापर निरुपयोगी साहित्याचे निविदा पध्दतीने विक्री करणेसाठी

## निविदा सुचना

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर हायलँड ड्राईव्ह, सेमिनरी हिल्स, नागपूर-06 येथील विनावापर निरुपयोगी जडवस्तू संग्रहाचा जाहिर लिलाव निविदा पध्दतीने करण्यात येत आहे. लिलावासाठी उपलब्ध असलेले साहित्य महाविद्यालय परिसरात दिनांक 20/12/2022 पासून दिनांक 04/01/2023 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी 2.00 ते 4.00 वाजेपर्यंत पहावयास उपलब्ध राहणार आहे.

ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी सिलबंद लिफाफ्यात निविदा दिनांक 04/01/2023 सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत. लिलावाच्या इतर अटी व शर्ती महाविद्यालयाच्या कार्यालयात तसेच www.nvcnagpur.net.in व www.mafsu.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. सिलबंद लिफाफे दिनांक 05/01/2023 रोजी दुपारी 12.00 वाजता उघडण्यात येणार आहेत.

**(डॉ. आ. पा. सोमकुवर)**
सहयोगी अधिष्ठाता,
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर

# निविदा पध्दतीने जाहिर लिलाव
## अटी व शर्ती

1) भंगार वस्तुच्या लिलावाकरीता नियुक्त केलेल्या समितीसमोर दिनांक 05/01/2023 रोजी दुपारी 12.00 वाजता निविदेचे सिलबंद लिफाफे उघडण्यात येतील.
2) ज्या फर्म / व्यक्तींना लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी रुपये 2,000/- रजिस्ट्रेशन फी (नापरतावा फी) महाविद्यालयाच्या रोखपालाकडे जमा करुन त्याची पावती दोन प्रतीत घ्यावी. सदर रुपये 2,000/- रजिस्ट्रेशन फी परत केली जाणार नाही याबाबत नोंद घेण्यात यावी.
3) लिलावासाठी निघालेल्या वस्तूंची आपण देवू करणारी निविदेची किंमत एका सिलबंद लिफाफ्यात कार्यालयात सादर करावी. सदर सिलबंद लिफाफ्यासोबत रुपये 2,000/- रजिस्ट्रेशन फी ची कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पावतीची एक प्रत सोबत जोडावी. लिफाफ्यासोबत रजिस्ट्रेशन फीची पावती सोबत जोडली नसल्यास सदर लिफाफा अवैध समजून कार्यालयीन कामकाजातून बाहेर काढला जाईल.
4) निविदेचा सिलबंद लिफाफा, रजिस्ट्रेशन फीची पावती, आधार कार्ड, पॅन कार्ड हे दस्तावेज पत्र लावून कार्यालयात दिनांक 04/01/2023 रोजी सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत सादर करावे. त्यानंतर सदर दस्तावेज स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
5) दिनांक 05/01/2023 रोजी दुपारी 12.00 वाजता निविदेचे सिलबंद लिफाफे उघडण्याचे वेळी कार्यालयाद्वारे दिलेली रुपये 2,000/- ची पावती व ज्या नावानी पावती आहे ते आधार कार्ड व पॅन कार्ड असणाऱ्या एकाच व्यक्तीस प्रवेश दिला जाईल. एका पावतीवर एका पेक्षा जास्त व्यक्तीस प्रवेश मिळणार नाही याची नोंद घ्यावी.
6) सर्व निरुपयोगी भंगार वस्तू या महाविद्यालयाच्या परिसरात तीन ठिकाणी ठेवण्यात येत आहे.
   अ) स्नातकपूर्व मुलांचे वसतीगृह
   ब) सुक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या समोरील रिकाम्या जागेत
   क) शरीररचनाशास्त्र विभागाच्या मागे असलेल्या गोडावूनमध्ये
7) अपेक्षेपेक्षा बोली कमी असल्यास संबधीत सामुग्री देण्याचा अथवा न देण्याचा सर्व अधिकार लिलाव समितीचा राहील. याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही अथवा या संबंधात कुठलाही पत्रव्यवहार होणार नाही.
8) काहीही कारण न दाखविता लिलाव रद्द, स्थगित करण्याचे अधिकार लिलाव समितीला राहील.
9) सर्व निविदेचे सिलबंद लिफाफे उघडण्यात आल्यानंतर ज्या फर्मचे / व्यक्तीचे **दर सर्वात जास्त असेल** त्या फर्म / व्यक्तीने संपूर्ण रक्कम त्याच दिवशी महाविद्यालयाच्या रोखपालकडे जमा करुन पावती घेण्यात यावी.
10) लिलावात खरेदी केलेल्या भंगार सामुग्रीची रक्कम भरणा केल्यानंतर संबंधीतांनी दिनांक 08/01/2023 पर्यंत संपूर्ण सामुग्रीची उचल **"जिथे आहे त्या स्थितीमध्ये"** स्वखर्चाने करावी लागेल. रक्कम भरणा केल्यानंतर भंगार सामुग्रीची कोणतीही जबाबदारी महाविद्यालयाची / लिलाव समितीची राहणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी घेणाऱ्याची राहील. विहीत कालावधीत भंगार

सामुग्रीची उचल न झाल्यास भरणा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल व भंगार वस्तूंचा नव्याने लिलाव करण्यात येईल.

11) लिलाव समितीने दिलेला निर्णय हा अंतीम स्वरुपाचा राहील व तो प्रत्येक भागधारकास बंधनकारक राहील.

12) लिलाव समितीच्या कामकाजामध्ये अडथळा आणणे, आरडाओरड करणे किंवा विविध प्रकारे दखल देणाऱ्यास या कामकाजातून बाद करण्यात येईल.

13) पंजीकरण / रजिस्ट्रेशन दिनांक 20/12/2022 ते दिनांक 04/01/2023 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंतच करण्यात येईल.

14) सिलबंद लिफाफे उघडण्याची तारीख :- दिनांक 05/01/2023 दुपारी 12.00 वाजता

15) सिलबंद लिफाफे उघडण्याचे ठिकाण :- महाविद्यालयाचे सभागृह.

**(डॉ. आ. पा. सोमकुवर)**
सहयोगी अधिष्ठाता,
नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर